# जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर

## खनिकर्म शाखा

स्वराज भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर

Email id- kolhapur.dmo@gmail.com

क्र.कार्या/६अ/आरआर/४८/२०१६ — दिनांक :११/२/२०१६

प्रति,

श्री. मल्हार मिनरल्स, कोल्हापूर

विषय :- महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ नुसार लॅटेराईट गौणखनिजाचे खनिपट्टा मंजूरी अर्जाबाबत.
मौजे आंबर्डे येथील गट नं. ९२१ मधील ३ हे.०० आर क्षेत्र मंजूरीबाबत

संदर्भ :- १. आपला दिनांक ८/२/२०१६ रोजीचा अर्ज. (प्राप्त दिनांक १०/२/२०१६)
२. मा. संचालक, भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेकडील पत्र क्र.एमएलआर/१८७७/२०१२/११६० दिनांक ६/७/२०१५ (प्राप्त दिनांक १२/७/२०१५)

उपरोक्त विषयाच्या व संदर्भ क्र. १ अन्वये आपण मौजे आंबर्डे येथील गट नं. ९२१ मधील ३ हे.०० आर क्षेत्र या क्षेत्राकरीता मागणी अर्ज सादर केला होता. परंतू मा. संचालक, भुविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर यांनी त्याचेकडील पत्र संदर्भ क्र. २ अन्वये गट नं. ९२१ मध्ये २० हेक्टर ०० आर क्षेत्र लॅटेराईट या गौणखनिजाकरीता उपलब्ध असलेबाबत कळविले आहे.

तेव्हा मौजे आंबर्डे येथील गट नं. ९२१ मधील ३ हे.०० आर क्षेत्राकरीता प्रचलित महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम २०१३ च्या अनुषंगाने खाणपट्टा मंजूरीकामी कलम २३ नुसार अर्जित क्षेत्राकरीता मान्य केलेला खाणकाम आराखडा आणि क्रमवधी खाण समाप्ती योजना, व कलम २३ (६) नुसार पर्यावरण व वन मंत्रालय, अधिसुचना दिनांक १४ सप्टेंबर २००६ यातील तरतुदीनुसार खाणकाम पट्टयाच्या क्षेत्रानुसार पुर्व पर्यावरणविषयक परवानगीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

सबब उक्त बाबीची पुर्तता तात्काळ या कार्यालयाकडे करावी, जेणेकरुन प्रकरणी पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

जिल्हा खनिकर्म अधिकारी
कोल्हापूर

NANDKUMAR B. SADIGALE,
RQP/GOA/226/2014/A